सहकारी औद्योगिक वसाहत योजना
प्रशासकीय मंजूरी देताना त्यामध्ये
अंतर्भूत करावयाच्या बाबी.

**महाराष्ट्र शासन,**
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय, क्र. आयईएस १०९४/(६६४८)/सीआर/उद्योग-१८,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १८ मार्च १९९७

ग्राचा : १) केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्रालयाचे दि. २३.२.६२ चे
पत्र क्र. ३ (२१)/६०/एसएसआय./(बी)
२) उद्योग व उर्जा विभागाचे इंग्रजी पत्र क्र. आयईएस-१०६७/
१७७२७/आयएनडी-२, दि. २९.५.१९६७

:

सहकारी औद्योगिक वसाहतीची योजना केंद्र शासनाकडून १९६२ सालापासून चालू असून सन १९६७ पासून ची अंमलबजावणी राज्य शासनामार्फत करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सहकारी औद्योगिक वसाहतींना य मान्यता मिळाल्यावर व २०:२०:६० या आर्थिक आकृतीबंधात शासनाकडून मान्यता मिळाल्यावर. एकूण र्चाच्या २०% समभाग भांडवल शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाते. सभासद वर्गणी ही २०% जमा लागते. बाकी ६०% रक्कम वित्तीय संस्था/आयुर्विमा महामंडळाकडून शासकीय हमीवर कर्ज रुपाने उपलब्ध ती जाते.

सहकारी औद्योगिक वसाहतींना प्रशासकीय मान्यता देताना प्रकल्प खर्चामध्ये कोणकोणत्या बाबींचा असावा. तसेच निकष काय असावेत त्या संदर्भात शासनाचे लेखी स्वरुपात स्पष्ट आदेश नव्हते. प्रशासकीय देताना आणि शासनाचे समभाग भांडवल देताना प्रकल्प खर्चामध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश असावा व काय असावेत त्या बाबतचे लिखित आदेश काढण्यात यावेत, असा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. । आता पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात आला आहे.

**निर्णय :-**

सहकारी औद्योगिक वसाहतींना प्रशासकीय मान्यता देताना आणि समभाग भांडवल देताना प्रकल्प खर्चामध्ये बाबींचा समावेश करावा व निकष खालीलप्रमाणे असावेत असा शासनाने निर्णय घेतला आहे.

**१) जमिनीची किंमत :**

काही वेळा सहकारी औद्योगिक वसाहतींचे प्रवर्तक त्या क्षेत्रातील खाजगी जमीन विकत घेतात, अशा वेळी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी खात्याने निश्चित केलेली त्या क्षेत्राची किंमत, किंवा संस्थेने जमिनीची दिलेली किंमत त्यातील जी कमी असेल ती रक्कम, प्रकल्प खर्चामध्ये अंतर्भूत करण्यात यावी.

**२) पायाभूत सोयी व सुविधा :**

अ) जमिनीचे समतलीकरण.
ब) अंतर्गत रस्ते, जोडरस्ते व सी. डी. वर्कस्
क) पाणी पुरवठा (अंतर्गत व बाहेरुन पाणी आणण्याचा खर्च)
ड) विद्युत पुरवठा.
इ) सांडपाणी व जलनिःरुसारण.
फ) प्रशासकीय इमारत.
ग) उपहार गृह
च) पहारेकरी यांची चौकी व निवासी व्यवस्था
छ) बँक व पोष्ट इमारत.
ज) प्रथमोपचार केंद्र
झ) बागबगीचे
ट) अग्निशमन इमारत व त्यातील यंत्रणा

वर नमूद केलेल्या सर्व पायाभूत सुविधांचा समावेश प्रकल्प खर्चात करण्यात यावा.

**३) कारखाने इमारतीचा खर्च :-**

सहकारी औद्योगिक वसाहतींच्या प्रकल्प खर्चामध्ये ही बाब आतापर्यंत अंतर्भूत करण्यात येत होती ती बाब तशीच पुढे चालू ठेवावी. मात्र शेडचे आकारमान (अ) ३० X २० फूट (ब) ३० X ३० फूट (क) ३० X ६० फूट असे ठेवण्यात यावे. उद्योजकांच्या लघु उद्योग योजनेस आवश्यक असलेले बांधकाम विचारात घेऊन त्यांना एक किंवा अधिक भूखंड देण्यात आले तरी आर्थिक मदतीसाठी एका भूखंडावरील एका शेडचा विचार एका उद्योजकासाठी करण्यात यावा.

मुंबई-पुणे प्राधिकरण विभाग आणि जिल्हा मुख्यालयाचे शहरी क्षेत्राचे कारखाने इमारतीच्या बाबींसाठी येणाऱ्या खर्चाचा समावेश योजनेच्या प्रकल्प खर्चामध्ये समभाग भांडवल मंजूर करण्यासाठी विचारात घेतला जाणार नाही.

**४) वास्तुशास्त्राची फी :-**

ही बाब पूर्वीपासून प्रकल्प योजनेत समाविष्ट असून ती पुढे चालू ठेवावी.

**५) पाणी पुरवठा :-**

वसाहतींना लागणारा बाह्य पाणी पुरवठा देण्याची ही व्यवस्था करण्यात यावी, यासाठीचा खर्च प्रकल्प योजनेत समाविष्ट करण्यात यावा.

६) वीज पुरवठा :-

वसाहतीत एक कार्यक्षम उपकेंद्र स्थापन करण्यात यावे व त्यासाठी होणारा खर्च हा संस्थेच्या प्रकल्प योजनेत समाविष्ट करण्यात यावा.

७) दळणवळण सुविधा :-

१. सहकारी औद्योगिक वसाहतीमध्ये दूरध्वनी/एस.टी.डी./फॅक्स आणि संपर्काच्या इतर सोयी उपलब्ध करण्यासाठी होणारा खर्च २०:२०:६० या आर्थिक आकृतिबंधात समाविष्ट करण्यात यावा.

२. सहकारी औद्योगिक वसाहतींना कर्जरुपाने भारतीय आयुर्विमा महामंडळामार्फत वित्त पुरवठा करण्यात येत होता व त्यास आकृतिबंधानुसार ६०% कर्जास शासन हमी देत होते. आयुर्विमा महामंडळाबरोबर राज्यस्तरीय वित्तीय महामंडळ, सिकॉम किंवा बँका यांनी सहकारी औद्योगिक वसाहतीस कर्ज पुरवठा केल्यास त्यांनाही शासकीय हमी देण्यात यावी.

३. सहकारी औद्योगिक वसाहतींना शासकीय भाग भांडवल अंशदान देण्याबाबतच्या अटी व शर्ती सोबतच्या परिशिष्टाप्रमाणे असाव्यात.

४. औद्योगिक सहकारी वसाहतींनी सादर केलेल्या प्रकल्प अहवालास तांत्रिक मंजूरी देण्याचे अधिकार विकास आयुक्त (उद्योग) यांना किंवा ते ज्यांना प्राधिकृत करतील त्यांना बहाल करण्यात येत आहेत.

५. हे आदेश वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर १३४/ व्यय-१६, दि. ११.३.१९९७ नुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-
(आ.बा.कांबळे)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१) सर्व मंत्रालयीन विभाग.
२) विकास आयुक्त (उद्योग), मुंबई.
३) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) विभागीय सह. निबंधक, सहकारी संस्था,
५) सर्व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था.
६) सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
७) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई
८) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), नागपूर
९) वरिष्ठ उपमहालेखापाल (पडताळणी), नागरी बाह्य लेखा परीक्षा विभाग, मुंबई
१०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
११) वित्त विभाग (व्यय -१६).
१२) नियोजन विभाग (योजना-१७)
१३) कार्यासन उद्योग -१७, उद्योग, उर्जा व कामगार विभाग.
१४) निवड नस्ती.

## परिशिष्ट

दिनांक १८ मार्च, १९९७ च्या शासन निर्णय

क्र. आयईएस १९९४/(६६४८)/

सीआर/उद्योग-१८ चे परिशिष्ट

### सहकारी औद्योगिक वसाहतींना शासकीय भाग भांडवल अंशदान देण्याबाबतच्या अटी व शर्ती.

सहकारी औद्योगिक वसाहत मर्यादित, यापुढे "संस्था" असे संबोधित करण्यात येईल. ही संस्था खालील अटी व शर्तीवर शासकीय भाग भांडवल अंशदान घेणे मान्य करील.

१. संस्था शासकीय समभाग भांडवल अंशदान प्राप्त झाल्यापासून सहा महिन्याचे अवधित राज्य शासनास महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे नावाने १५ वर्षाचे विमोचनीय भाग दाखले देईल.

२. शासनास विमोचनीय भाग भांडवल परतफेड करण्यासाठी 'संस्था' भांग भांडवल परतफेड निधी उभा करील व सदर निधीत प्रतिवर्षी निव्वळ नफा काढण्यापूर्वी एकूण शासकीय भाग भांडवल अंशदानाच्या १/१५ एवढी रक्कम सदरहू निधीत जमा करील. जर संस्थेस एखाद्या वर्षी सदरहू भाग भांडवलाच्या १/१५ एवढी रक्कम कमी पडत असेल तर, ती संस्था व्यवस्थापकीय समितीने ठरविलेल्या दराने अशा कमी पडणाऱ्या रकमेची भरपाई करण्यासाठी आपल्या सभासदाकडून अतिरिक्त भाग भांडवल जमा करील.

३. शासकीय समभाग भांडवलाची परतफेड संस्थेस, शासकीय समभाग भांडवल मिळाल्याचा तारखेपासून दोन वर्षांनंतर चालू होईल. सदर दोन वर्षाचा कालावधी हा 'विलंबावधी' समजण्यात येईल व संस्था पुढील १३ वर्षात १३ समान हप्त्यांत संपूर्ण शासकीय समभाग भांडवल रक्कम परत करील. प्रत्येक असा देय हप्ता ज्या वर्षात तो देय होईल. त्याच्या आगामी वर्षाच्या १० जानेवारी किंवा तत्पूर्वी देय असेल. संस्थेने ह्या अटींची पूर्तता केल्याची खात्री करुन घेण्याची व त्याप्रमाणे प्रमाणित करण्याची जबाबदारी ही (शासकीय) वैधानिक लेखा परिक्षकांची राहील.

४. संस्थेला शासकीय समभाग भांडवल परतफेडीचा हप्ता आगाऊ भरण्याची मुभा राहील.

५. जर संस्थेने शासकीय समभाग भांडवलाच्या परतफेडीच्या वार्षिक हप्तापोटीची देय रक्कम देय तारखेपासून तीन महिन्याच्या आत भरली नाही तर ती संपूर्ण रक्कम वसुल होईपर्यंत त्या थकीत रकमेवर ९% दराने दंडनीय रक्कम देण्यास संस्था जबाबदार राहील.

६. जर संस्थेने शासकीय समभाग भांडवलाच्या परतफेडीच्या हप्त्याची रक्कम ती देय दिनांकापासून सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी थकविल्यास अशी थकीत रक्कम प्रचलित असलेल्या महसुली थकबाकी कायद्यानुसार वसुल करण्यात येईल.

७. संस्थेस भाग भांडवल परतफेड निधी आपल्या सभासदांच्या कारखान्याच्या इमारती बांधकामासाठी वापरता येणार नाही.

८. संस्थने भाग भांडवल परतफेड निधीची रक्कम संस्थेच्या व्यवहाराचे बाहेर गुंतवणूक केली पाहिजे. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांच्या निर्देशानुसार सदर रक्कम गुंतवावी लागेल.

९. शासकीय समभाग भांडवलाची परतफेड शासनास पुर्णपणे झाल्याखेरीज संस्थेस आपल्या सभासदांच्या भाग भांडवलाची रक्कम परत करता येणार नाही. परंतु जर एखादी संस्था त्यानंतर अवसायानात (लिविवेडशन) घेतली असल्यास भाग भांडवलाची रक्कम निबंधकांनी ठरविलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून मुदतीपूर्वी परत करता येईल.

१०. अ) संस्थेने लाभांश जाहीर केल्यापासून तीन महिन्याचे आत शासकीय समभाग भांडवलावरील देय लाभांश संस्था शासकीय कोषागारात जमा करील व त्याप्रमाणे विकास आयुक्त (उद्योग) व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना कळविल. तसेच देय परंतु शासनास अद्याप न भरलेल्या लाभांशाची रक्कम त्या संदर्भात आदेश दिल्यापासून तीन महिन्याचे आत शासनाकडे जमा करील. या अटीची पूर्तता न केल्यास त्या तारखेस शिल्लक असलेली शासकीय समभाग भांडवलाची संपूर्ण रक्कम परत घेता येईल. तसेच या संदर्भातील अटी व शर्तीचा उल्लंघन केले आहे असे समजून संस्था योग्य त्या कार्यवाहीस पात्र राहील.

ब) ही अट संस्थेस यापूर्वी दिलेल्या व शिल्लक असलेल्या भाग भांडवलाचे बाबतीतही लागू राहील.

११. शासकीय समभाग भांडवल संपूर्ण परतफेड होईपर्यंन्त, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, किंवा सह निबंधक सहकारी संस्था (औ.व.शा.) उद्योग संचालनालय, यांच्या पूर्व परवानगीशिवाय ४% पेक्षा अधिक लाभांश जाहीर करणार नाही.

१२. शासकीय समभाग भांडवल मिळाल्यापासून सहा महिन्याचे कालावधीत संस्थेने बांधकाम सुरु केले पाहिजे.

१३. अ) शासकीय समभाग भांडवल असेपर्यन्त सहकारी औद्योगिक वसाहत संस्थेतील व्यवस्थापक किंवा इतर कोणताही कर्मचारी ज्याचे मासिक वेतन रुपये १५००/- किंवा त्यापेक्षा जास्त असेल अशाची नेमणूक नोंदणी अधिकारी यांचे पूर्व मान्यतेने करण्यात येईल.

ब) व्यवस्थापक व तत्सम इतर कर्मचारी यांना शिक्षा देणे व बडतर्फ करणेसाठी नोंदणी अधिकारी यांचे पूर्व परवानगीनेच करण्यात येईल. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांना संस्थेवर मुख्याधिकारी म्हणून व्यवस्थापकांची नियुक्ती करण्याचे अधिकार राहतील.

क) संस्थेच्या सेवाप्रवेश व पदोन्नतीचे वेळी व अनुसूचित जाती-जमाती व इतर मागासवर्गीय व इतर आर्थिक दुर्बल वर्ग यांचे बाबतीत शासनाचे धोरण व आदेशाचे पालन संस्था करील.

१४. महालेखापाल यांनी मागणी केल्यास संस्था त्यांना संस्थेचे हिशोब व त्यासंबंधीचे सर्व संबंधित कागदपत्र तपासणीसाठी हजर करेल.

१५. संस्थेने शासनाकडून अंशदान किंवा आर्थिक सहाय्य प्राप्त झाल्यापासून सहा महिन्याचे आत सुधारित आदर्श उपविधी स्विकारले नसल्यास संस्था ते स्विकारील, किंवा ह्या अटी व शर्तीची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने अस्तित्वात असलेल्या उपविधीमध्ये जरूर पडल्यास योग्य ती दुरुस्ती करेल.

१६. वर नमूद केलेल्या अटी व शर्तीचा भंग झाल्यास राज्य शासन समभाग भांडवलाच्या अंशदानाची रक्कम संपूर्णतः किंवा अंशतः परत मागण्याचे अधिकार राखून ठेवत आहे.

१७. या अटी व शर्तीमध्ये जरुरीप्रमाणे सुधारणा किंवा बदल करण्याचे अधिकार राज्य शासन राखून ठेवत आहे व अशा प्रकारे बदललेल्या अटी व शर्ती ह्यात बदल किंवा सुधारणा केल्याच्या तारखेपासून संस्थेवर बंधनकारक राहतील.

१८. या अटी व शर्ती यापूर्वी शासनाने मंजूर केलेल्या शासकीय भाग भांडवलाच्या अटी व शर्तीत समाविष्ट राहतील असे समजण्यात येईल व तसेच यापूर्वी त्याची तरतूद केली नसल्यास ह्या अटी अतिरिक्त अटी समजण्यात येतील.

१९. वरील अटी व शर्ती तसेच ह्या संदर्भात शासनाने विहित केलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याचा ठराव संस्था करील. संस्था वरील अटी व शर्तीचा समावेश करुन संमत केलेला ठराव शासकीय समभाग भांडवल मंजूर करणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यांना शक्य तितक्या लवकर सादर करेल व त्या नंतर मंजूर केलेली रक्कम संस्थेस अदा करण्यात येईल.

२०. संस्थेने अनुसूचित जातीच्या उद्योजक सभासदांसाठी भूखंडाचे वाटपाबाबत शासनाने वेळोवेळी काढल्यालेल्या परिपत्रकातील अटी व शर्तीचे काटेकोरपणे पालन करावे.

२१. ज्या संस्था शासनाकडून आर्थिक मदतीचा लाभ घेतात अशा संस्थेमध्ये १० किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचाऱ्यांची संख्या असल्यास माजी सैनिकासाठी १५% आरक्षण ठेवावे. हे आरक्षण सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र.एसआरव्ही-१०७१/६५५४, दि. २९.३.७२ मधील १३% आरक्षणाच्या जागा सहीत धरुन असावे.

२२. ज्या सहकारी संस्थामध्ये कर्मचारी वर्गाची संख्या १० पेक्षा जास्त आहे. संस्थेने त्याचेकडे असलेल्या एकूण जागापैकी ३४% जागा मागासवर्गीयासाठी राखून ठेवाव्यात. मागासवर्गीयांच्या एखाद्या विशिष्ट गटासाठी राखून ठेवलेल्या रिकाम्या पदासाठी कोणतेही पद योग्य उमेदवारांच्या अभावी त्या गटातील उमेदवारांची नेमणूक करुन भरता आली नाही तर ती भरती ५ वर्षापर्यंत त्या गटासाठी तशीच राखून ठेवावी. मात्र सेवाभरती करताना कोणत्याही वेळी राखून ठेवावयाची पदे आणि तशी चालू ठेवलेली मागील राखीव पदे या दोघांची मिळून होणारी संख्या ही अशा भरतीच्यावेळी रिकाम्या असलेल्या एकूण पदाच्या ५० टक्केपेक्षा अधिक होऊ नये. केवळ दोनच रिकामी पदे असल्यास त्यापैकी एक पद राखीव म्हणून समजण्यात यावे. परंतु जर एकच पद रिकामे असेल तर ते बिन राखीव म्हणून समजण्यात यावे. ५० टक्केपेक्षा अधिक होणारे आरक्षण पुढच्या सेवा भरतीच्या वेळेपर्यंत तसेच राखून ठेवण्यात यावे. मात्र ती भरती ५ वर्षपेक्षा अधिक काळ राखून ठेवली जाऊ नये.